**G20 नेत्यांच्या शिखर परिषदेसाठी पंतप्रधानांची जोहान्सबर्ग, दक्षिण आफ्रिकेला भेट (21 - 23 नोव्हेंबर 2025)**

19 नोव्हेंबर 2025

दक्षिण आफ्रिकेद्वारे आयोजित 20व्या G20 नेत्यांच्या शिखर परिषदेत उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी 21-23 नोव्हेंबर, 2025 रोजी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गला भेट देणार आहेत. ग्लोबल साउथमध्ये आयोजित केली जाणारी ही सलग चौथी G20 शिखर परिषद असेल. शिखर परिषदेत, पंतप्रधान G20 अजेंडावरील भारताचा दृष्टिकोन मांडतील. शिखर परिषदेच्या तीनही सत्रांमध्ये पंतप्रधान बोलतील अशी अपेक्षा आहे. हे सत्र पुढील विषयांवर आहेत:

i. सर्वांच्या सोबतीने सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक विकास: आपल्या अर्थव्यवस्थेला उभारी; व्यापाराची भूमिका; विकास आणि कर्जभारासाठी वित्त पुरवठा

ii. लवचिक जग - G20 चे योगदान: आपत्ती जोखीम कमी करणे; हवामान बदल; न्याय्य ऊर्जा संक्रमण; अन्न प्रणाली

iii. सर्वांसाठी योग्य आणि न्यायपूर्ण भविष्य: महत्त्वपूर्ण खनिजे; सन्मानजनक रोजगार; कृत्रिम बुद्धिमत्ता

2. G20 नेत्यांच्या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, जोहान्सबर्गमध्ये उपस्थित असलेल्या काही नेत्यांसोबत पंतप्रधानांनी द्विपक्षीय बैठका घेणे अपेक्षित आहे. दक्षिण आफ्रिकेद्वारे आयोजित भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका (IBSA) नेत्यांच्या बैठकीतही पंतप्रधान सहभागी होणार आहेत.

नवी दिल्ली

19 नोव्हेंबर 2025